By order of the Board of Directors
Sd/-
Pravin D. Desai
Vice President and Company Secretary

Place: Mumbai
Date: 2nd July, 2021

निर्माते-कलादिग्दर्शक वेठीस; राजकीय-बिगरराजकीय संघटनांचा शिरकाव

चित्रसृष्टीला गुंडगिरीचा विळखा...

लोकसत्ता खास प्रतिनिधी

मुंबई : कामगार संघटना आणि मजूर पुरवणारे कंत्राटदार चित्रपट-मालिकांच्या निर्मात्यांना पैशांसाठी वेठीस धरतात. यातील मजूर पुरविणाऱ्या कंत्राटदारांकडे गुन्हे शाखा विशेष लक्ष देत असून प्रतिबंधात्मक उपायही योजले जात आहेत. मात्र तक्रार होत नसल्याने चित्रनगरीत अस्तित्व असलेल्या राजकीय, बिगरराजकीय संघटना मात्र मोकाट आहेत, असा दावा एका वरिष्ठ अधिकाऱ्याने केला.

चित्रनगरीत नेपथ्य उभारणी, काम आटोपल्यावर त्याची विल्हेवाट आणि नेपथ्याची सुरक्षा यासाठी मोठ्या प्रमाणावर कुशल, अकुशल मजुरांची आवश्यकता भासते. हे मजूर पुरविण्याचे कंत्राट मिळवण्यासाठी अनेकांत चढाओढ आहे. या कंत्राटदारांमध्ये काही गुंड, सराईत गुन्हेगार आहेत. काही गुंडांच्या पाठबळावर दादागिरी करतात. या स्पर्धेने कंत्राटदारांच्या टोळ्या अस्तित्वात आल्यापासून त्या एकमेकांवर सतत कुरघोडी करत असतात. यातून हत्या, हत्येचा प्रयत्न, हाणामारी, अपहरण, खंडणी आदी गंभीर गुन्हे चित्रनगरी, आरे वसाहतीत घडले आहेत. या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेने मजूर, सुरक्षारक्षक पुरविणाऱ्या कंत्राटदारांची यादी तयार केली. यातील गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्यांची संपूर्ण माहिती नोंद केली. त्यांना नियमितपणे गुन्हे शाखेच्या कार्यालयात हजर राहावे, अशी सूचना केली.

गेल्या पाच महिन्यांपासून कंत्राटदार हजेरी लावत आहेत, असे गुन्हे शाखेच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मात्र कामगार संघटनांकडून होणाऱ्या जाचाबाबत एकही तक्रार आरेसह आसपासच्या पोलीस ठाण्यात दाखल नसल्याचे अतिरिक्त आयुक्त दिलीप सावंत, आरे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक नूतन पवार यांनी सांगितले.

अशाप्रकारची गुंडगिरी आणि युनियनचा धाक सगळीकडे आहे. हा धाक विकृत आणि स्वार्थी आहे. या सगळ्या सेट्सवर अजूनही बरेच धाक आहेत. आठवड्याला पैसे पोहोचले नाहीत तर ते सेट्स तोडून निघून जातात. तुम्ही कितीही गयावया केले तरी तुमचे ऐकून घेतले जात नाही. राजू साप्तेंच्या सेटवरही हे घडले आहे, अशी माहिती दिग्दर्शक-निर्माते वीरेंद्र प्रधान यांनी दिली.

मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार कुठल्याही संघटनेचा किंवा राजकीय पक्षाचा माणूस सेटवर जाऊन चित्रिकरण बंद पाडू शकत नाही. यापुढे कुठल्याही संघटनेचा माणूस सेटवर येऊन अशापध्दतीने त्रास देत असेल तर मनसेच्या जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधा. अशा लोकांचा बंदोबस्त मनसेतर्फे केला जाईल, असे महाराष्ट्र नवनिर्माण चित्रपट कर्मचारी सेनेचे अध्यक्ष अमेय खोपकर यांनी सांगितले. यापुढे कुठल्याही सेटवर मराठी माणसाला चित्रीकरण बंद करण्याची धमकी दिली वा पैसे देण्यासाठी तगादा लावला तर त्यांचे हातपाय तोडल्याशिवाय राहणार नाही, असा इशारा खोपकर यांनी दिला

कलादिग्दर्शक राजू साप्ते यांच्या आत्महत्येची घटना अत्यंत दुर्दैवी आहे. त्यांच्या समस्यांबद्दल त्यांनी कोणाशीतरी बोलायला हवे होते. आत्महत्या हा त्यावरचा उपाय नाही, अशी भावना शिवसेना चित्रपट सेनेचे अध्यक्ष आदेश बांदेकर यांनी व्यक्त केली. मात्र सेटवरच्या या अशा गुंडगिरीला आळा बसवण्याच्या दृष्टीने उपाययोजना करायला हव्यात. त्या उद्देशानेच काही कलादिग्दर्शक, निर्माते एकत्र येऊन सोमवारी मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदे आणि सुव्यवस्था) विश्वास नांगरे पाटील यांची भेट घेणार आहेत, अशी माहिती बांदेकर यांनी दिली.



गुन्ह्यांचा इतिहास...

● २०१५ मध्ये राजू शिंदे यांची चित्रनगरीत गोळ्या घालून हत्या करण्यात आली होती. चित्रनगरीतील बरीचशी कंत्राटे शिंदे यांनाच मिळत. त्यामुळे त्यांच्या हत्येमागे कंत्राट मिळविण्यासाठीची स्पर्धा असावी, असाही एक अंदाज होता.

● २०१७ - चित्रनगरीत सुरक्षा पुरविण्याचे कंत्राट न मिळाल्याने अन्य कंत्राटदाराने विरा पांडियन यांची हत्या घडवून आणली होती.

● २०१९ - सराईत गुंड शिवा शेट्टी आणि त्याचे साथीदार चित्र नगरीत धडकले. त्यांनी एका निर्मात्या कंपनीने चित्रीकरणासाठी उभारलेल्या नेपथ्याची तोडफोड केली. या प्रकरणात पोलिसांनी मोक्कानुसार गुन्हा नोंदवला. शेट्टीने सुचविलेल्या व्यक्तीस कंत्राट न दिल्याने त्याने हा गुन्हा केला होता. त्या आधीही शेट्टीची चित्रनगरीवर दहशत होती.

धमकावणी....

चित्रनगरीत ४० हून अधिक कामगार संघटना आहेत. त्यात १० ते १२ राजकीय पक्षांच्या संघटनांचा समावेश होतो. या संघटना चित्रपट-मालिका निर्मितीशी संबंधित व्यक्तींकडे पैशांची मागणी करतात. ती पूर्ण न केल्यास 'सेट'वर जाऊन धमकावणे, चित्रीकरण थांबवणे, कामगारांना हाताशी धरून काम बंद पाडणे हे प्रकार चित्रनगरीत वरचेवर होतात, अशी माहिती पोलिसांना खबऱ्यांकडून मिळते. तक्रार केल्यास भविष्यात काम करू देणार नाहीत, या भीतीने मध्यस्थ गाठून तडजोड करण्यावर अधिक भर असतो. या तडजोडीबाबत कमालीची गुप्तता पाळली जाते, असे अन्य एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. चित्रनगरीतील अभिलेखवरील (रेकॉर्ड) गुन्हेगारांकडून गुन्हा घडू नये यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाय योजण्यात आले आहेत, असे गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अकबर पठाण यांनी सांगितले. मात्र अधिक तपशील देण्यास त्यांनी नकार दिला.

साप्तेंवर चिंचवडला अंत्यसंस्कार

चिंचवड लिंक रस्ता येथील स्मशानभूमीत शनिवारी दुपारी राजू साप्ते यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी त्यांचे कुटुंबीय आणि निकटवर्तीय उपस्थित होते.

"या घटनेला जबाबदार असणाऱ्यांना शिक्षा मिळालीच पाहिजे. मला न्याय मिळवून द्यावा, अशी असोसिएशनला विनंती आहे.

\- सोनाली साप्ते, राजू साप्ते यांची पत्नी

...तर साप्ते वाचू शकले असते

राजेश साप्ते यांनी आत्महत्येपूर्वी समाजमाध्यमांवर प्रसारित केलेली ध्वनिचित्रफीत दिंडोशी पोलिसांच्या हाती शुक्रवारी संध्याकाळीच पडली होती. साप्ते यांनी आरोप केलेले राकेश मौर्य यांनीच ती पोलिसांना आणून दाखवली. पोलिसांनी साप्ते यांचा ठावठिकाणा शोधण्याचा प्रयत्न केला. पुण्याच्या वाकड परिसरात साप्ते यांचे भ्रमणध्वनी स्थान आढळताच दिंडोशी पोलिसांनी वाकड पोलिसांना कळवून तातडीने शोधमोहीम राबविण्यास सांगितले. साप्ते यांचा नेमका ठावठिकाणा वेळीच हाती लागला असता तर त्यांचा जीव वाचू शकला असता.

नाहक बळी...

साप्ते यांच्यासारख्या उत्तम कलादिग्दर्शकाचा संघटनांच्या गुंडगिरीत नाहक बळी गेला आहे, असे मत निर्माते नितीन वैद्य यांनी व्यक्त केले. वैद्य यांच्या 'जय भवानी जय शिवाजी' या मालिकेच्या सेटचे काम साप्ते करत होते. त्यांना या कामाचे पैसेही देण्यात आले होते. मात्र आर्थिक वाद उकरून काढत मौर्य याने पैशाची मागणी केली होती. अडवणूकीमुळे हातातील कामे जात असल्याचा ताण त्यांना आला होता. त्यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले असावे, असे वैद्य यांनी सांगितले.

वरळीतील 'लव्ह ग्रोव्ह' उड्डाणपूल आज बंद

मुंबई : वरळीतील डॉ. ॲनी बेझेंट मार्गावरील लव्ह ग्रोव्ह उड्डाणपूलाच्या नादुरुस्त बेअरिंग बदलण्याचे काम शनिवारी सायंकाळी ७ वाजल्यापासून सुरु झाले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा (एमएसआरडीसी) कडून शनिवार आणि रविवार असे हे काम सुरू राहणार आहे. तर ८ ऑगस्टपर्यंत दर शनिवार-रविवार हे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे ८ ऑगस्ट पर्यंत दर शनिवार-रविवार हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार आहे.सहा टप्प्यात हे काम हाती घेण्यात आले आहे. एकूण सहा ट्राफिक ब्लॉक असणार असून ८ ऑगस्टपर्यंत शनिवार-रविवारी हे ब्लॉक घेत बेअरिंग बदलण्याचे काम करण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्याला ४२ हजार लसमात्रा

ठाणे : राज्य शासनाकडून ठाणे जिल्ह्याला ४२ हजार लसमात्रा उपलब्ध झाल्याने ठाणे आणि बदलापूर शहरामध्ये चार दिवसानंतर म्हणजेच शनिवारपासून पुन्हा लसीकरण मोहीम सुरू झाली आहे. कल्याण-डोंबिवली शहरात मात्र लसीकरण मोहीम बंदच होती.

लसीकरणादरम्यान शिवसैनिकांमध्ये वाद

शिवाईनगर भागातील केंद्रावर लसीकरणादरम्यान शिवसैनिकांमध्ये वाद झाला. शिवसेनेच्या एका पदाधिकाऱ्याने त्याच्या कार्यकर्त्यांना आणि ओळखीच्या नागरिकांना आपल्या संस्थेचे टोकन लसीकरणासाठी दिले होते. हे टोकन घेऊन येणारे नागरिक लसीकरणासाठी थेट केंद्रांमध्ये जात होते. यामुळे रांगेत उभे असलेल्या नागरिकांना लस मिळत नसल्याने शिवसेनेच्या दुसऱ्या पदाधिकाऱ्याने त्यावर आक्षेप घेतला.

नवी मुंबईतही बोगस लसीकरण

नवी मुंबई : नवी मुंबईतही बोगस लसीकरणाचा प्रकार उघड झाला आहे. शिरवणे येथील एका शिबिरात बोगस लस दिल्याचे निष्पन्न झाले आहे. डॉ. मनीष त्रिपाठी, करीम अशी या दोन आरोपींची नावे असून तिसऱ्याचा शोध सुरू आहे.

Oriental Aromatics Ltd.
ओरिएन्टल ॲरोमॅटिक्स लिमिटेड

सीआयएन : एल१७२९९एमएच१९७२पीएलसी२८५७३१
नोंदणीकृत कार्यालय : १३३, जहांगीर बिल्डिंग, दुसरा मजला, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई-४००००१
टेलि : ९१-२२-४३२१४००० **फॅक्स :** ९१-२२-४३२१४०९९
ईमेल : cs@orientalaromatics.com **वेबसाइट :** www.orientalaromatics.com

सूचना

ही सूचना सुधारित ("नियम") केल्यानुसार इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड ॲथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिट, ट्रान्स्फर ॲण्ड रिफंड) रुल्स, २०१६ यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम २०१३च्या लागू तरतुदींच्या अनुसार प्रसिद्ध करण्यात आली आहे.

नियमांमध्ये इन्व्हेस्टर एज्युकेशन ॲण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) सस्पेंस अकाउंटच्या नावे भागांच्या स्थानांतरणाकरिता, इतर गोष्टींसमवेत, तरतुदींचा समावेश आहे, ज्यांचे सलग सात वर्षे व अधिक कालावधीकरिता लाभांशाचे प्रदान झालेले नाही किंवा दावा केलेला नाही.

याअधिक सूचना देण्यात येते की, नियमांच्या तरतुदींच्या अनुसार, योग्य कार्यवाही होण्याकरिता, आयईपीएफ सस्पेन्स अकाउंटमध्ये स्थानांतरण होत असलेल्या भागांच्या तपशिलाच्या तरतुदीसह, इतर गोष्टींसमवेत, कंपनीच्या रेकॉर्ड्समधील नवीनतम उपलब्ध असलेल्या संबंधित भागधारकांच्या पत्त्यांवर त्यांना वैयक्तिक सूचना याआधीच पाठविण्यात आल्या आहेत. कंपनीने सदर भागधारकांचा संपूर्ण तपशील, ज्यांचे भाग आयईपीएफमध्ये स्थानांतरणास पात्र आहेत, **www.orientalaromatics.com** या कंपनीच्या वेबसाइटवर अपलोड करण्यात आला आहे.

संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी १० ऑक्टोबर २०२१ रोजी किंवा तत्पूर्वी प्रदान न झालेल्या / दावा न केलेल्या लाभांशाच्या रकमेकरिता दावा करावा, त्यास असमर्थ ठरल्यास सदर भागांचे आयईपीएफ सस्पेन्स अकाउंटमध्ये स्थानांतरण करण्यात येईल. कृपया नोंद घ्यावी की, दावा न केलेली लाभांशाची रक्कम व आयईपीएफकडे स्थानांतरण झालेल्या समन्याय भागांच्या बाबतीत कंपनीच्या विरोधात कोणताही दावा करता येणार नाही.

भागधारकांनी नोंद घ्यावी की दोन्ही, दावा न केलेली लाभांशाची रक्कम आणि सदर भागांवरील उपार्जित सर्व लाभ अंतर्भूत आयईपीएफकडे स्थानांतरण झालेले समन्याय भाग, जर असल्यास, याकरिता नियमांद्वारे विहित प्रक्रियेचे अनुसरण करून, आयईपीएफ ॲथोरिटीकडून त्यांच्याद्वारा दावा परत करता येऊ शकेल. नियम आणि विहित केल्यानुसार अर्ज प्रपत्र (फॉर्म आयईपीएफ-५) **www.iepf.gov.in** या आयईपीएफच्या वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

कोणतीही अधिक माहिती / स्पष्टीकरण याकरिता भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी आमच्या आरटीए, लिंक इन्टाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिट : ओरिएन्टल ॲरोमॅटिक्स लिमिटेड, सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई-४०००८३, टेलि : ०२२-४९१८६२७० फॅक्स : ०२२-४९१८६०६०, ईमेल : rnt.helpdesk@linkintime.co.in येथे संपर्क साधावा किंवा लेखी कळवावे किंवा कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्त्यावर नोडल ऑफिसर - श्रीमती किरणप्रीत गिल यांच्याशीसुद्धा संपर्क साधता येईल.

ओरिएन्टल ॲरोमॅटिक्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
किरणप्रीत गिल
कंपनी सचिव

तारीख : ०२.०७.२०२१
स्थळ : मुंबई

नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : दुसरा मजला, सनटेक सेंटर, ३७/४० सुभाष रोड, विलेपार्ले (पू.), मुंबई-४०००५७. **टेलि क्र.:** ०२२-६६५०९९९९.
फॅक्स क्र.: ०२२-६६५०९८००, **वेबसाइट :** www.nfil.in, **ईमेल :** info@nfil.in
सीआयएन क्र.: एल२४११०एमएच१९९८पीएलसी११५४९९

Responsible Care

सूचना

याद्वारा सूचना देण्यात येते की, सद्य चालू असलेली कोव्हिड-१९ महामारी लक्षात घेता कंपनीची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") कंपन्या अधिनियम, २०१३ ("कायदा") आणि त्याखालील तयार केलेले नियम यासह वाचलेल्या नियमांच्या लागू तरतुदी आणि निगम कामकाज मंत्रालयाच्या ("एमसीए") दिनांकित १३ जानेवारी २०२१, ०५ मे २०२०, ०८ एप्रिल २०२० व १३ एप्रिल २०२० साधारण परिपत्रके आणि दिनांकित १५ जानेवारी २०२१ व १२ मे २०२१ सेबी परिपत्रकांच्या अनुपालनार्थ, एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/अदर ऑडियो व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") द्वारा सोमवार, २६ जुलै २०२१ रोजी दु. ०३.०० वा. (भाप्रवे) घेण्यात येणार आहे.

पूर्वोक्त एमसीए व सेबी परिपत्रकांच्या अनुसार, एजीएम सूचना समाविष्ट वित्तीय वर्ष २०२०-२०२१ करिता वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारा अशा सदस्यांना ज्यांचे ईमेल आयडी'ज कंपनी किंवा तिचे रजिस्ट्रार ॲण्ड ट्रान्स्फर एजन्ट, केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड ("केफिन टेक") किंवा त्यांच्या डिपॉझिटरिजकडे नोंदणीकृत आहेत, त्यांना ०३ जुलै २०२१ रोजी पाठविण्यात आले आहेत. एजीएम सूचना समाविष्ट वित्तीय वर्ष २०२०-२०२१ करिता वार्षिक अहवाल www.nfil.in या कंपनीच्या वेबसाइटवर www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर आणि www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवर तसेच https://evoting.kfintech.com/ या "केफिन टेक"च्या रिमोट ई-व्होटिंग वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

ज्या सदस्यांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, अशा सदस्यांना परिणामी वार्षिक अहवाल, एजीएमची सूचना व ई-व्होटिंग सूचना पाठविता येणार नाहीत, ते https://ris.kfintech.com/clientservices/mobilereg/mobileemailreg.aspx या वेबलिंकवर प्रवेश करून "केफिन टेक"कडे त्यांचा ईमेल पत्ता व मोबाइल नंबर तात्पुरता नोंदणीकृत करू शकतील. सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी युजर आयडी व पासवर्डसमवेत सूचना व ई-व्होटिंग सूचनांच्या सॉफ्ट प्रती पाठविण्याकरिता ईमेल पत्ता व मोबाइल नंबर प्राप्त करण्याकरिता मार्गदर्शकसूत्रांनुसार प्रक्रियेचे अनुपालन करावे. जर कोणतीही शंका असल्यास, सदस्य einward.ris@kfintech.com यावरून लेखी विनंती करू शकतील.

जर ईमेल आयडी'ज याआधी नोंदणीकृत केलेले नसल्यास कायमस्वरूपी नोंदणीकरिता खालील प्रक्रियेबाबत सदस्यांनी नोंद घ्यावी : (१) ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत, ते पुढील तपशिलासमवेत einward.ris@kfintech.com यावरून विनंती पाठवू शकतील - फोलिओ नंबर, नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड प्रत (पुढील व मागील बाजू), पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित स्कॅन्ड प्रत व पत्त्यासंबंधित कोणताही पुरावा; (२) ज्या सदस्यांकडे डिमॅट स्वरूपात भाग आहेत, ते त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे ("डीपी'ज") त्यांच्या ईमेल आयडी'जची नोंदणी करू शकतील.

कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, नियम २० यासह वाचलेल्या कायद्याच्या कलम १०८ व सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन, २०१५ ("सेबी रेग्युलेशन्स")च्या रेग्युलेशन ४४ आणि सेक्रेटरियल स्टॅण्डर्ड-२ च्या अनुसार, कंपनीला तिच्या सदस्यांना एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार सर्व ठरावांवर त्यांचे इलेक्ट्रॉनिक प्रणालीत मतदान करण्याकरिता सुविधेची तरतूद करून देताना आनंद वाटत आहे. इलेक्ट्रॉनिक प्रणालीमार्फत मतदानाद्वारा कामकाजावर विचारविनिमय करता येईल. कंपनीने रिमोट ई-व्होटिंग प्लॅटफॉर्म व "व्हीसी" / "ओएव्हीएम"द्वारा एजीएममध्ये सहभागी होण्याकरिता आणि तेथे मतदान करण्याची तरतूद होण्याकरिता "केफिन टेक"ची सेवा लागू करण्यात आली आहे. रिमोट ई-व्होटिंग, एजीएममध्ये ई-व्होटिंग व "व्हीसी" / "ओएव्हीएम"द्वारा एजीएममध्ये हजर राहणे याकरिता सविस्तर सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आल्या आहेत. सदस्यांना खालील बाबींची नोंद घेण्याची विनंती करण्यात आली आहे :

(ए) रिमोट ई-व्होटिंग शुक्रवार, २३ जुलै २०२१ रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, २५ जुलै २०२१ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) संपेल. रिमोट ई-व्होटिंगकरिता २५ जुलै २०२१ रोजी सायं. ०५.०० वा. (भाप्रवे) दरम्यान अनुमती देण्यात येणार नाही. ई-व्होटिंगकरिता सुविधा एजीएममध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे आणि जे सदस्य "व्हीसी" / "ओएव्हीएम"द्वारा एजीएममध्ये हजर राहणार आहेत व ज्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारा त्यांचे मतदान केलेले नाही, ते सभेमध्ये त्यांच्या मतदानाचा हक्क बजाविण्यास सक्षम असतील. सदस्य जरी त्यांनी रिमोट ई-व्होटिंगद्वारा मतदान केल्यानंतरसुद्धा ते एजीएममध्ये सहभागी होऊ शकतील; परंतु सभेमध्ये त्यांना पुन्हा मतदान करण्यास अनुमती दिली जाणार नाही.

(बी) एजीएम सूचनेमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर मतदान करण्याकरिता सदस्यांची पात्रता निश्चित करण्याबाबत कट-ऑफ तारीख सोमवार, १९ जुलै २०२१ ही आहे. ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेनुसार डिपॉझिटरिजद्वारा ठेवण्यात आलेल्या लाभाधिकारी मालकांच्या नोंदवहीत किंवा सदस्यांच्या नोंदवहीत अभिलिखित आहे, तीच केवळ रिमोट ई-व्होटिंग किंवा एजीएममधील ई-व्होटिंग सुविधेचा लाभ घेण्यास हक्कदार असेल. कोणतीही व्यक्ती एजीएमची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि कट-ऑफ तारीख म्हणजेच १९ जुलै २०२१ रोजीप्रमाणे तिच्याजवळ भाग आहेत, ती einward.ris@kfintech.com यावर विनंती पाठवून किंवा एजीएम सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार प्रक्रियेचे अनुपालन करून लॉग-इन अधिकारपत्रे प्राप्त करू शकेल.

(सी) ई-व्होटिंगसंबंधित कोणतीही शंका असल्यास, कृपया https://evoting.kfintech.com या "केफिन टेक"च्या वेबसाइटवर उपलब्ध असलेल्या "हेल्प ॲण्ड एफएक्यू'ज सेक्शनला भेट द्यावी. पर्यायी, सदस्य संपर्क साधू शकतील : श्री. आनंदा मुल्या, उपव्यवस्थापक, केफिन टेक्नोलॉजीस प्रायव्हेट लिमिटेड, सेलेनियम टॉवर "बी", प्लॉट नं. ३१/३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद-५०० ०३२; ईमेल आयडी : evoting@kfintech.com/ananda.moolya@kfintech.com; टेलि क्र. : +९१ ०४० ६७१६२२२२ / ६७१६१६२७; टोल-फ्री क्र. : १८००३०९४००१ याद्वारासुद्धा सूचना देण्यात येते की, कायद्याच्या कलम ९१ व त्याखाली तयार केलेले नियम आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ४२ च्या अनुसार कंपनीच्या सदस्यांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तिका लाभांशाच्या प्रदानाकरिता, जर एजीएममध्ये घोषित करण्यात आल्यास, सदस्यांची पात्रता निश्चित करण्याच्या हेतुप्रीत्यर्थ मंगळवार, १३ जुलै २०२१ पासून शुक्रवार, १६ जुलै २०२१ पर्यंत (दोन्ही दिवस धरून) बंद ठेवण्यात येईल.

नवीन फ्लोरिन इंटरनॅशनल लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
नीरज बी. मंकड
अध्यक्ष विधि व कंपनी सचिव

PADMANABH MAFATLAL GROUP
Creating value. Sharing value.

स्थळ : मुंबई
दिनांकित : ०३ जुलै २०२१

सुमिटोमो केमिकल इंडिया लिमिटेड

सीआयएन: एल२४११०एमएच२०००पीएलसी१२४२२४
नोंदणीकृत कार्यालय: बिल्डिंग नं. १, तळमजला, शांत मॅनॉर-को-हा. सो. लि., चक्रवर्ती अशोक क्रॉस रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई-४००१०१

कंपनीच्या भागधारकांचे लक्ष वेधण्यासाठी सूचना
एकविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि दूरस्थ ई-मतदान व सभेतील ई-मतदान याबाबत माहिती

एजीएम बोलविणाऱ्या सूचनेमध्ये मांडलेले कामकाज करण्याकरिता, कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्याखाली केलेले नियम यांचे सर्व लागू उपबंध आणि ८ एप्रिल २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १४/२०२०, १३ एप्रिल, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. १७/२०२०, १५ जून, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. २२/२०२०, २८ सप्टेंबर, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. ३३, ३१ डिसेंबर, २०२० दिनांकित परिपत्रक क्र. ३९/२०२० व १३ जानेवारी २०२१ दिनांकित परिपत्रक क्र. ०२/२०२१ सोबत वाचावयाचे ५ मे २०२० दिनांकित सामान्य परिपत्रक क्र. २०/२०२० आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ("एमसीए") व सेबीद्वारा निर्गमित अन्य लागू परिपत्रके (एकत्रितरीत्या "संबंधित परिपत्रके" म्हणून उल्लेखित) यासोबत वाचावयाचे दी सिक्युरिटीज ॲण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ यांचे अनुपालन करून, सामाइक ठिकाणी सदस्यांच्या शारीरिक उपस्थितीशिवाय, **शुक्रवार ३० जुलै २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी") / अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") च्या माध्यमातून कंपनीची **एकविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा** घेण्यात येणार आहे. सदस्यांना केवळ व्हीसी/ ओएव्हीएममार्फत एजीएमला उपस्थित राहता येईल. व्हीसी/ ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून सहभागी होणाऱ्या सदस्यांना कंपनी अधिनियम २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत गणपूर्तीच्या प्रयोजनासाठी गणण्यात येईल. संबंधित परिपत्रकांचे अनुपालन करून १ जुलै २०२१ रोजी एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२०-२१ चा वार्षिक अहवाल पाहण्यासाठी लिंक, कंपनीच्या त्या सदस्यांना केवळ ई-मेलद्वारा पाठविण्यात आली आहे. ज्यांचे ईमेल ॲड्रेसिस या कंपनीकडे / डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे नोंदविलेले आहेत. एजीएममध्ये सामील होण्याकरिता सदस्यांसाठी सविस्तर सूचना, एजीएमच्या सूचनेमध्ये दिल्या आहेत. पूर्वोक्त कागदपत्रे, कंपनीच्या वेबसाइटवर **www.sumichem.co.in** मध्ये आणि दी स्टॉक एक्स्चेंजिसच्या म्हणजेच बीएसई लिमिटेड व दी नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांच्या वेबसाइटवर अनुक्रमे **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** मध्ये सुद्धा उपलब्ध आहेत.

ज्यांना एजीएमची सूचना व वार्षिक अहवाल ई-मेलद्वारा मिळाला नसेल आणि जे तो ई-मेलद्वारा मिळवू इच्छितात अशा सदस्यांनी **investor.relations@sumichem.co.in** वर त्यासाठी ई-मेल विनंती पाठवावी.

एजीएमच्या सूचनेमध्ये उल्लेखिलेली कागदपत्रे, एजीएमच्या सूचनेच्या पाठवणीच्या तारखेपासून एजीएम समाप्त होईपर्यंत कंपनीच्या वेबसाइटवर **www.sumichem.co.in** मध्ये सुद्धा उपलब्ध आहेत.

ई-मेल आयडी आणि बँक खात्याचे तपशील यांची नोंदणी

जर भागधारकाने, लिंक इनटाइम इंडिया प्राइव्हेट लि.- कंपनीचे आरटीए/ डिपॉझिटरीज यांच्याकडे आपला ईमेल ॲड्रेस नोंदविला नसेल आणि / अथवा लाभांश मिळण्यासाठी अनिवार्य असलेले बँक खाते विषयक तपशील अद्ययावत केले नसतील तर पुढील सूचनांचे पालन करावे:

(i) कृपया आरटीएच्या वेबसाइटवर **www.linkintime.co.in** मध्ये इन्व्हेस्टर सर्व्हिसेस > ईमेल बँक डिटेल रजिस्ट्रेशन अंतर्गत लॉगइन करा- तपशील भरा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करा व सादर करा.

किंवा

डिमॅट प्रकारात भाग धारण केले असल्यास:

(ii) भागधारकाने डिपॉझिटरी पार्टिसिपन्टशी ("डीपी') संपर्क साधावा आणि डीपीद्वारा सूचित व अवलंबित प्रक्रियेनुसार डिमॅट खात्यात बँक खात्याचे तपशील आणि ई-मेल ॲड्रेस नोंदवावा.

दूरस्थ ई-मतदान आणि एजीएममधील ई-मतदान यासाठी पद्धत व सूचना

दूरस्थ ई-मतदान, एजीएममध्ये सहभागी होणे आणि एजीएममधील ई-मतदान यासाठी पद्धत व सविस्तर सूचना, एजीएमच्या सूचनेमध्ये दिल्या आहेत. एजीएमची सूचना, कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. हे तपशील मिळवण्यासाठी भागधारकांनी कृपया कंपनीच्या वेबसाइटला **www.sumichem.co.in** मध्ये भेट द्यावी.

मतदानासाठी पात्रता निश्चित करण्याकरिता कट-ऑफ डेट

कट-ऑफ डेट म्हणजेच **शुक्रवार, २३ जुलै २०२१** रोजीनुसार सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरींनी तयार केलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत ज्यांचे नाव नोंदविलेले असेल. केवळ अशीच व्यक्ती दूरस्थ ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यास किंवा एजीएममध्ये सहभागासाठी आणि इन्स्टापोलद्वारा मतदान करण्यासाठी अधिकारपात्र राहील.

दूरस्थ ई-मतदान कालावधी

दूरस्थ ई-मतदानाची मुदत **सोमवार २६ जुलै, २०२१ रोजी (सकाळी ९ वाजता)** सुरू होईल आणि **गुरुवार, २९ जुलै २०२१ रोजी (सायं. ५ वाजता)** संपेल. या कालावधीत, **शुक्रवार, २३ जुलै २०२१** रोजीनुसार भौतिक रूपात किंवा अ-भौतिक रूपात भाग धारण करीत असलेले कंपनीचे भागधारक इलेक्ट्रॉनिकरीत्या आपले मत नोंदवू शकतील. त्यानंतर दूरस्थ ई-मतदान सुविधा निष्क्रिय केली जाईल आणि त्यानंतर दूरस्थ ई-मतदान करता येणार नाही. ही सूचना पाठविल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने कंपनीचे भाग संपादित केले व कंपनीची सदस्य बनली आणि कट-ऑफ डेट रोजीनुसार भाग धारण करीत असेल तर अशी व्यक्ती **instameet@linkintime.co.in** वर विनंती पाठवून लॉगइन आयडी व पासवर्ड मिळवू शकते.

तथापि, तो/ती जर अगोदरच दूरस्थ ई-मतदानासाठी एलआयआयपीएलकडे नोंदणीकृत असेल तर तो/ ती मतदानाकरिता विद्यमान यूजर आयडी आणि पासवर्डचा उपयोग करू शकतात.

दूरस्थ ई-मतदान द्वारा आपले मत नोंदविणारे सदस्य, एजीएमला हजर सुद्धा राहू शकतात परंतु एजीएममध्ये त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

ई-मतदानसंदर्भात भागधारकांना / सदस्यांना काही विचारणा किंवा प्रश्न असतील तर ते **instameet@linkintime.co.in** वर ईमेल पाठवू शकतात अथवा फोन नंबर (०२२-४९१८६१७५) वर फोन करू शकतात.

ठरावांवरील मतदानाचा निकाल

दूरस्थ ई-मतदान प्रक्रिया आणि एजीएममधील ई-मतदान यांचे योग्य व पारदर्शक पद्धतीने परिनिरीक्षण करण्यासाठी कंपनीच्या संचालक मंडळाने परिनिरीक्षक म्हणून श्री. प्रशांत दिवाण, कार्यरत कंपनी सचिव यांची नियुक्ती केली आहे.

एजीएमच्या समाप्तीनंतर दोन दिवसात ठरावावरील मतदानाचा निकाल जाहीर करण्यात येईल व एकत्रिकृत परिनिरीक्षकांच्या अहवालासमवेत कंपनीच्या वेबसाइटवर **www.sumichem.co.in** मध्ये आणि लिंक इनटाइम इंडिया प्रा. लि.च्या वेबसाइटवर प्रसारित केला जाईल व कंपनीचे भाग जिथे सूचिबद्ध आहेत अशा बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज इंडिया लिमिटेड यांना सुद्धा कळविण्यात येतील.

लाभांशावरील कर वजात

संचालक मंडळाने शिफारस केलेला लाभांश जर एजीएममध्ये सदस्यांनी संमत केला तर प्रदान करण्यात येईल. लाभांश, आयकर अधिनियम व त्याखालील नियम यांच्या उपबंधांनुसार स्रोतातून कर वजात (टीडीएस) सापेक्ष राहील. लाभांशावरील टीडीएस विषयी सर्वसाधारण माहिती आणि टीडीएसमध्ये सवलतीचा दावा सांगण्यासाठी भागधारकांकरिता पद्धत नमूद केलेली संसूचना भागधारकांना मेसर्स लिंक इनटाइम इंडिया प्राइव्हेट लिमिटेड, आमचे रजिस्ट्रार्स ॲण्ड ट्रान्स्फर एजन्ट्स (आरटीए) यांनी पाठवली आहे. संसूचनेचा मसुदा कंपनीच्या वेबसाइटवर **www.sumichem.co.in** मध्ये उपलब्ध आहे. भागधारकांना विनंती करण्यात येते की, टीडीएसमधील सवलतीसाठी विनंती / टीडीएस संबंधी अन्य कागदपत्रे व माहिती आरटीएकडे सादर करण्याकरिता उक्त संसूचना पाहावी.

संचालक मंडळाच्या आदेशावरून
स्वाक्षरी/-
प्रवीण डी. देसाई
उपाध्यक्ष आणि कंपनी सचिव

स्थळ: मुंबई
दिनांक: २ जुलै २०२१

पश्चिम रेल्वे
रद्द केल्याची सूचना

अनुक्रमांक : १. निविदा क्र. बीसीटी/२१-२२/१२९ दिनांक : २८.०६.२०२१. **उघडण्याची तारीख : २३.०७.२०२१** ही **रद्द करण्यात आली आहे;** असे समजावे.

0233

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे
स्वच्छतेची कामे

निविदा सूचना क्र. आणि तारीख: ईएल/टीआरओ/टी/आरआर/बीसीटी-बीएसआर-व्हीआर/२०२१-२४ दिनांक: ०२.०७.२०२१. काम आणि जागा: मुंबई डिव्हिजनच्या बीसीटी (मेन), बीएसआर आणि व्हीआर (स्क्रॅप यार्ड) येथील रनिंग रूम स्वच्छ राखणे, कॉल/ बॉक्स बॉय आणि सेवा यांची तरतूद करणे तसेच अर्थसाह्याने भोजनाची व्यवस्था करणे इत्यादी कामे करणे. **कामाचा अंदाजे खर्च:** ₹ १४,१८,७९,६५४.८४ **इ.र.ठेव:** निरंक. **सादर करण्याची तारीख आणि वेळ:** ०४.०८.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत. **उघडण्याची तारीख आणि वेळ:** ०४.०८.२०२१ रोजी १५.३० वाजता. ही निविदा **www.ireps.gov.in** या वेबसाइटवर पाहता येईल.

0232

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

मध्य रेल्वे
रोड गुड्स शेडचा विकास व देखभाल

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि करिता विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कमर्शियल), मध्य रेल्वे, पहिला मजला, रिझर्व्हेशन बिल्डिंग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई-४०० ००१ हे खालील कामाकरिता ई-बोलीद्वारा निविदा मागवीत आहेत. **कामाचे नाव:** दहा (१०) वर्षांच्या कालावधीकरिता अनुमती दिल्यानुसार टर्मिनल चार्जेस/ टर्मिनल ॲक्सेस चार्जेसच्या बदल्यात खासगी गुंतवणुकीद्वारा कॉमन युजर फॅसिलिटी म्हणून भिवंडी रोड गुड्स शेडकडील इन्फ्रास्ट्रक्चर फॅसिलिटीजचा विकास व देखभाल तसेच अन्य व्यावसायिक क्रियाकलाप. **कार्यालयाचा पत्ता:** विभागीय रेल्वे व्यवस्थापक (कमर्शियल), मुंबई विभाग, मध्य रेल्वे, पहिला मजला, रिझर्व्हेशन सेन्टर, मुंबई सीएसएमटी-४०० ००१. लॅण्डलाइन नं.: ०२२-६७४-५५०३७. **ठिकाण:** भिवंडी रोड गुड्स शेड. **अंदाजित खर्च:** रु. ९.१५ कोटी. **इसारा रक्कम ठेव:** रु. १०,००,०००/-. **निविदा कागदपत्रांची किंमत:** रु. ५,०००/-. **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** ०६ ऑगस्ट, २०२१ रोजी दु. ०३.०० वा.पर्यंत. **कंत्राटाचा कालावधी: कामाची पूर्तता-** एलओएच्या निर्गमनाच्या तारखेपासून एक वर्ष. **योजनेअंतर्गत प्रोत्साहक:** म्हणजेच कामाच्या पूर्ततेच्या तारखेपासून दहा वर्षांच्या कालावधीकरिता अनुमती दिल्यानुसार भिवंडी रोड गुड्स शेडकडील सर्व आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या वाहतुकीकरिता, जसे असेल त्यानुसार, टर्मिनल चार्जेस व टर्मिनल ॲक्सेस चार्जेसची शेअरिंग तसेच अन्य व्यावसायिक क्रियाकलाप. **प्रस्तावाची वैधता:** निविदा उघडणीपासून ४५ दिवस. **वेबसाइटवर उपलब्ध निविदा कागदपत्रे:** कागदपत्रे केवळ **www.ireps.gov.in** या वेबसाइटवरून प्राप्त करता येतील.

खुली ई-निविदा (एकेरी लिफाफा पद्धत): बीबी.सी.१३०.डब्ल्यूए.गुड्स. बीआयआरडी.२०२१

रेलमदत हेल्पलाइन १३९ 258

मध्य रेल्वे
सामग्री व्यवस्थापन विभाग
ई-प्रापण सूचना क्र. ई-२४/२०२१, दि. ०१.०७.२०२१

निविदा क्र.	निविदा वर्णन	परिमाण	टी.ओ.डी.
२७२११२४२	इम्पेलर व कूलिंग ब्लोअरचा सेट	१५० सेट्स	२६.०७.२०२१
२७२१२४३९	ब्रश होल्डर सपोर्ट असेम्ब्ली	७६८ नग	२६.०७.२०२१
२७२१२१६६	१५ टिथ मोटर पिनियन	२१० नग	२७.०७.२०२१
२७२१२३०४	ड्रम कॉन्टॅक्ट सेगमेन्ट असेम्ब्ली	४७५ नग	२७.०७.२०२१
२७२१२२०७	डिजिटल नॉच इण्डिकेटर	४१ नग	२८.०७.२०२१
२७२१२६८५	फूट-कम-फ्लेन्ज माऊन्टेड इण्डक्शन मोटर	४५ नग	२८.०७.२०२१
२७२१२१९३	मोडिफाइड फिल्टर पॅनेल असेम्ब्ली	१९१० नग	२९.०७.२०२१
२७२१२७८०	मेन कॉम्प्रेसर	४० नग	२९.०७.२०२१
४२२११५३६	सीमेन्स ट्रॅक्शन मोटरकरिता पिनियन	१५९ नग	०६.०८.२०२१

सविस्तर सूचना व निविदा शर्तीसंबंधित कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळांवर भेट द्यावी.

रेलमदत हेल्पलाइन १३९ 256

पश्चिम रेल्वे
ई-प्रापण निविदा सूचना क्र. एस/२५/२०२१ दिनांक : २९.०६.२०२१

अ. क्र.	सामग्रीचे संक्षिप्त वर्णन	परिमाण	टी.ओ.डी.
६५५	स्प्लीट कॉटर	११२७४० नग	०५.०७.२०२१
६५६	सेमी कण्डक्टर	६३ नग	१५.०७.२०२१
६५८	हार्डनरसह लाइट वेट बॉडी फिल्टर	१००० किग्रॅ	१६.०७.२०२१
६५९	एमएस हॉलो स्क्वेअर ट्यूब	१२५०० किग्रॅ	१६.०७.२०२१
६६०	एमएस हॉलो रेक्टॅन्ग्यूलर ट्यूब	१२५०० किग्रॅ	१६.०७.२०२१
६६१	रोलर शटर डोअर्स	५० नग	१६.०७.२०२१
६६२	एम.एस. ब्लॅक हेक्झागॉन हेड बोल्ट	२४४८९ किग्रॅ	१९.०७.२०२१
६६३	कट रेसिस्टन्स हॅण्ड ग्लोव्हर	१२७५९ जोड्या	१९.०७.२०२१
६६४	एमएसडीएसी ट्रान्स्पोर्टेशन इन्स्ट्र. टेस्टिंग ॲण्ड कम्यु.	०१ सेट	१९.०७.२०२१
६६५	टॅपर्ड रोलर बेअरिंग	४०५ नग	१९.०७.२०२१
६६६	ॲक्सेल बॉक्सकरिता रिअर कव्हर	१५० नग	१९.०७.२०२१
६६७	हेक्झागोनल हेड बोल्ट % हेक्स नट	५१९६ नग	१९.०७.२०२१
६६८	हेडलाइटकरिता कॉन्ट्रॅक्टर	११ नग	१९.०७.२०२१
६६९	बीपीटीएनकरिता व्हॉल्व्ह सीट	१४१ नग	१९.०७.२०२१
६७०	बीपीटीएनकरिता लॅडर अप्पर	७० नग	१९.०७.२०२१
६७१	शेल डायला एस३ झेडएक्स-१	५६४३ लि.	१९.०७.२०२१
६७२	डक्ट एअर फ्लेक्झिबल	१२७ नग	१९.०७.२०२१
६७३	व्हॉल्व्ह असेम्ब्ली	१५१ नग	१९.०७.२०२१
६७४	५डब्ल्यू, ट्युब्युलर एलईडी लॅम्प्स	११७८३ नग	२०.०७.२०२१
६७५	ॲक्सेल बॉक्सकरिता डस्ट शिल्ड स्प्रिंग	८७३ नग	२०.०७.२०२१
६७६	ॲक्सेल बॉक्स गाइडकरिता स्प्रिंग सरक्लिप	३९११ नग	२०.०७.२०२१
६७७	गॅड्स एस५ व्हीं४२ पीर.५ ग्रीझ	६४१ नग	२०.०७.२०२१
६७८	आर/एम पेन्ट कलर ब्लॅक	१५६५९० लि.	२१.०७.२०२१
६७९	हॅच डोअरकरिता सुटेबल पॅनेल फिल्टर्स	८०० नग	२१.०७.२०२१
६८०	१२५ केव्हीए सायलन्ट डी.जी. सेट	१ सेट	२१.०७.२०२१
६८१	ॲसेटल गाइड रिंग	२४९१३ नग	२१.०७.२०२१
६८२	ॲक्सेल बॉक्स गाइडकरिता स्पेशल स्क्रू	२५५ नग	२१.०७.२०२१
६८३	ॲक्सेल बॉक्सकरिता लोअर स्प्रिंग सीट	८७३ नग	२१.०७.२०२१
६८४	ॲक्सेल बॉक्सकरिता रबर पॅकिंग रिंग	२६४६९ नग	२१.०७.२०२१
६८५	मॉनिटरसह ॲनेस्थेसिया मशीन	०२ नग	२१.०७.२०२१
६८६	ॲक्सेल बॉक्सकरिता गाइड ब्रश	३५० नग	२२.०७.२०२१
६८७	१००एमएम लुब्रिकेटेड टॅपर प्लगकरिता ग्लॅण्ड	११४७ नग	२२.०७.२०२१
६८८	ऑप्टिमल ऑप्टिगीअर २२० ऑइल	१४६४ किग्रॅ	२२.०७.२०२१
६८९	एक्स्प्रेसर/कॉम्प्रेलर क्रॅन्क केस ऑइल	२७७२२ लि.	२२.०७.२०२१
६९०	पोर्टेबल ऑपरेशन थिएटर लाइट	०१ सेट	२२.०७.२०२१
६९१	फूट पेडलसह सक्शन मशीन	०१ नग	२२.०७.२०२१
	रिव्हर्स ऑक्शन		
१	रेल्वे सिग्नलिंग केबल साइज १२ कोअर×१.५ चौ.मी.	१७६३ किमी	१५.०७.२०२१
२	जेली फिल्ड क्वॉड केबल ०६ क्वॉड ०.९ एमएम डाया	७२६ किमी	२२.०७.२०२१

शुद्धिपत्रे : कृपया खालील निविदांकरिता निर्गमित केलेल्या शुद्धिपत्राकरिता **www.ireps.gov.in** या वेबसाइटला भेट द्यावी. अ.क्र. ६०३ (मेजरिंग व मॉनिटरिंग) **निविदा सूचना क्र. एस/२२/२०२१ दि. ०९.०६.२०२१ नियत रोजी ०२.०७.२०२१ असलेली १२.०७.२०२१ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.**

सविस्तर सूचना, इरठे, खरेदी निर्बंध आणि सविस्तर निविदा शर्तीकरिता कृपया **www.ireps.gov.in** आणि **www.wr.indianrailways.gov.in** या वेबसाइट्सना भेट द्यावी.

0729 **प्रधान मुख्य सामग्री व्यवस्थापकांकरिता**

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly | आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

epaper.loksatta.com